| | |
|---|---|
| MHBU070017772023 | CNR NO: MHBU070017772023 |
| | नि.फौ.प्रकरण क्र.१९४/२०२३ |
| | सरकार .वि. राहुल चौधरी |

निशाणी क्र. ९१ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज अर्जदार राजेश रुपचंद निंबाळकर यांनी त्यांचा थ्री व्हीलर ॲटो व मोटरसायकल सुपूर्तनाम्यावर मिळण्याकरीता दाखल केला असुन त्याने पटलावर ॲटो व मोटरसायकलचे आर.सी.बुक, वाहनाचे पर्टीकुलर व त्याच्या आधारकार्डच्या साक्षांकीत प्रती सादर केल्या आहेत. याअर्जद्वारे अर्जदाराने जप्त ॲटो ज्याचा नोंदणी क्र. एम. एच. २८ बी.ए. ११५७ ज्याचा चेसीस क्र. MBX0009TF2B269296 इंजीन क्र. 2302S003747 तसेच हिरो पॅशन कंपनीची मोटरसायकल ज्याचा नोंदणी क्र. एम.एच. २८ बी.एस.९१६८ चेसीस क्र. MBLJAW261NHH12910 इंजीन क्र. JA06EANHH17450 ची अर्जदाराने सुपूर्तनाम्यावर मिळणेकरीता मागणी केली आहे.

२. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी जप्त ॲटो व मोटरसायकल अर्जदारास सुपुर्तनाम्यावर देण्यास हरकत घेतली तसेच सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला ॲटो व मोटरसायकल खरेदी करण्याकरीता आरोपीने फिर्यादी तसेच गावातील शेतकरी यांची फसवणुक करुन मिळवलेल्या पैशाचा वापर केल्याची शक्यता असल्यामुळे सदरचा ॲटो व मोटरसायकल अर्जदारास सुपूर्तनाम्यावर देण्यास हरकत नोंदवुन अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

३. अर्जदाराने त्याच्या म्हणण्याच्या पुष्ठेतार्थ वाहन नोंदणीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत्य, मोटरसायकलचे पर्टीकुलरची सत्यप्रत, छापील खबरची सत्यप्रत, आधार कार्डाची सत्यप्रत नि.क्र.०३ खाली दाखल केली.

४. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन त्याने मागणी केलेले वाहन ॲटो व मोटरसायकल हे कागदोपत्री त्याच्या मालकीचे असल्याबाबत दिसुन येत आहे. परंतु सहायक सरकारी वकील यांच्या म्हणण्यानुसार सदरचे ॲटो व मोटरसायकल ही वाहने आरोपीने प्रकरणातील फिर्यादी तसेच इतर शेतकरी यांची फसवणुक करुन त्यातुन मिळालेल्या रकमेतुन खेरदी केल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की प्रकरणात आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी तसेच इतर

शेतक–यांकडुन शेतमाल खरेदी केला परंतु त्यांना त्याचा मोबदला दिला नाही. करीता सदरचा गुन्हा सर्व आरोपींविरुध्द नोंदविण्यात आला आहे व अर्जदार सुध्दा प्रकरणातील आरोपींमध्ये समाविष्ट आहे. त्यामुळे गुन्हयातील पैशाचा वापर करुन सदरचे वाहन खरेदी केले असल्याचे प्रथमदर्शी दिसुन येते आहे. त्यामुळे सद्यस्थीतीत सदरचे ॲटो वाहन अर्जदारास सुपूर्तनाम्यावर देणे न्यायोचीत होणार नाही. तसेच गुन्हयाचे स्वरुप लक्षात घेता सहायक सरकारी अभियोक्ता यांनी सदरचे वाहन सुपुर्तनाम्यावर देण्यास घेतलेल्या आक्षेपामध्ये प्रथमदर्शनी तथ्य दिसुन येते. करीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्जदाराचा अर्ज नि.क्र. ९१ नामंजुर करण्यात येतो.

स्वा./-

दिनांक :- ०७.०२.२०२४

( जे. आर. घाडगे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग १ ले कोर्ट शेगांव.

CNR NO: MHBU070017772023

नि.फौ.प्रकरण क्र.१९४ /२०२३
सरकार - वि- राहुल चौधरी
निशाण क्र. ९१ खालील आदेश

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर शब्द न शब्द मुळ निकालाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांवः– के. एस. देशमुख, ग्रेड–३
न्यायालयाचे नांवः– न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,पहिले कोर्ट, शेगांव.
दिनांकः– ०७.०२.२०२४.